# छ. शाहू महाराज यांचे शेती, शिक्षण आणि औद्योगिकरण या क्षेत्रातील योगदान

**प्रा. डॉ. केशव हरेल** कोल्हापूर मो. नं. 9423842312

---

**प्रस्तावना:-**

छ. शाहू महाराज यांना गादीवर आल्यानंतर अवघ्या दोन वर्षातच (१८९६-९७) दुष्काळी परिस्थितीशी सामना करावा लागला. त्यांनी भुदरगड, रायबाग, करकोळ आणि पन्हाळा पेट्यांचा दौरा केला. त्याचप्रमाणे प्रथमच सरकारतर्फे पाटबंधारे सर्वेक्षण कार्य (Irrigation Survey Work) १९०२ सालीच सुरु केले. १९०७ साली भोगावती नदीवर त्या काळचे भारतातील सर्वात मोठे असे धरण(राधानगरी) बांधण्याचे निश्चित केले. १९०९ साली प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात केली. या धरणामुळे कोल्हापूर जिल्हा, त्यातील ग्रामीण भाग यामध्ये आर्थिक, सामाजिक व राजकीय या सर्वांमुळे सांस्कृतिक स्वरूपाचे मुलभूत बदल घडून आले आहेत. शेतीला होणाऱ्या पाणी पुरवठ्यामुळे ऊस लागवडीला उत्पादन वाढीला चालना मिळाली त्यामुळे गुळाचे उत्पादन व साखर कारखान्यांची संख्या वाढू लागली. गुळ व साखरेचे उत्पादन तर वाढलेच पण साखर कारखानदारांच्या इतर कार्यामुळे शिक्षण, खेळ, मनोरंजन अशा स्वरूपाच्या सोयी वाढत्या प्रमाणावर उपलब्ध झाल्या. व्यापार, वाहतूक, दळणवळण विस्तारले. अन्नधान्य वाढायला मदत झाली. ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या हातात पैसा खेळू लागला. शेतीतील गुंतवणूक शेती संशोधन वाढू लागले. शेतीतील बदल, वीजनिर्मिती यामुळे घरगुती उद्योग, कुटीर व लघुउद्योग, शेतीवर आधारित उद्योग यांचा विकास होत गेला. दुग्धव्यवसाय, पशुपालन, कुक्कुटपालन यांनाही चालना मिळाली. कोल्हापूर, इचलकरंजी शहरांना पाणी उपलब्ध झाले. बंधारे बांधून पाणी साठविल्याने मासे वाढण्यास पोषक वातावरण निर्माण झाले. बंधारे बांधल्यावर त्यावरील रस्त्यामुळे जिल्ह्यातील दळणवळण वाढण्यास मदत झाली. बंधारे पूल यांमुळे एका बंधाऱ्याकडून दुसऱ्या बंधाऱ्याकडे पाण्यातून मर्यादित पण स्वस्त वाहतूक उपलब्ध झाली या सर्व बदलांमुळे रोजगार संधी वाढण्यास मदत झाली.

१९९२ साली कोल्हापुरात स्वतंत्र शेती संस्था स्थापण्यात आली होती. या सुधारित औजारांचे एक म्युझियम उघडण्यात आले होते. त्यांच्या कारकीर्दीत शेतीमधील प्रयोग करून दाखविणाऱ्या एका डेमॉन्स्ट्रेटरची नेमणूक करण्यात आली होती. आज प्रात्याक्षिके दाखवितात तशी ८० ते १०० वर्षापूर्वी कोल्हापूर संस्थानात दाखविली जात होती. अशी शाहू महाराजांची दूरदृष्टी दिसते.शाहू महाराजांच्या काळात शेती व जनावरांची प्रदर्शने भरविली जात.स्पर्धा लावल्या जात. बक्षिसे दिली जात. आदर्श शेतीचे प्रयोग करून दाखविले जात. शेती सुधारणेसाठी जे जे शक्य होते ते ते केले जाई. आता स्वातंत्र्यानंतर उपयुक्त ठरलेल्या सर्व प्रयोगांची बीजे शाहू महाराजांच्या कारकिर्दीत आढळतात. संस्थानाच्या हद्दीत वेगवेगळी पिके लावण्याचा सुद्धा उपक्रम केला. पन्हाळा व भुदरगड येथे चहाची व कॉफीची लागवड केली. वेलदोडे, कोको, रबर, ताग, अंबाडी कंबोडियन कापूस ही पिके लावली.

शेतीच्या जोडधंद्याचाही शाहू महाराजानी विचार केला होता. त्यांच्या भाषणात तसे स्पष्ट उल्लेख आढळतात. शेतकीच्या जनावरांची पैदास, त्यांच्या चांगल्या जातींची पैदास, कोंबडी व बदकांची पैदास, दुधदुभत्याची उत्पत्ती याही बाबी त्यांच्या आर्थिक विचाराचे भाग बनल्या होत्या.

१८९५ साली 'शाहूपुरी' ही नवीन व्यापारी पेठ शेतीमालाच्या उठावासाठी स्थापन करण्यात आली. कोल्हापूर शहरापुरते न पाहता आर्थिक 'विकेंद्रीकरण' करण्याचा दृष्टीकोन ठेवून १९१७ साली 'जयसिंगपुर' ही नवीन वसाहत स्थापन केली. येथे तंबाखूची आणि गडहिंग्लज येथे गुळ, मिरची, भुईमुग यांची व्यापारी पेठ तयार झाली. कोल्हापुरात गुळाची व्यापारी पेठ स्थापन केली. १८९४-९५ साली निश्चित जेमतेम ६ लाख रुपये होती. तीच १९२१ साली तीस लाख रुपये झाली आणि ५ पट वाढली. व्यापारवृद्धीसाठी असे प्रयत्न केलेले संस्थानिक इतर कुणी फारसे दिसत नाहीत, म्हणून कोल्हापूरच्या व्यापारपेठेचे जनकत्वसुद्धा शाहू महाराजांकडेच जाते.

**शिक्षण-**

शिक्षण केवळ बौद्धिक विकासाकरिताच आवश्यक नाही तर कृषी विकास सेवादले, उद्योगधंदे आणि आर्थिक विकास याकरिता पण गरजेचे आहे. शिक्षण हे जात, धर्म, भाषा यावर आधारलेले भेद नाहीसे करण्याचे एक साधन होय. समाजामध्ये सामाजिक एकात्मता आणण्यासाठी आणि रियासतीमधील प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी शिक्षणाचा प्रसार आवश्यक आहे त्यांच्या मते जर सर्वच वर्गांना शैक्षणिक सुविधा पुरविल्या गेल्या तर सर्वांचाच विकास होईल.

**१) प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण:-**

छ. शाहू यांनी माध्यमिक आणि उच्च शिक्षणापेक्षा प्राथमिक शिक्षणावर जादा भर दिला.

प्राथमिक आणि माध्यमिक शाळांची संख्या १८९४ मध्ये २२१ होती ती १९०३ ते १९०४ मध्ये २४५ झाली पुढे ते १९९४ पर्यंत ३७५ आणि १९२१ ते १९२२ पर्यंत ती ५५५ झाली याखेरीज मुलीकरिता आणि मुलांकरिता प्राथमिक आणि

माध्यमिक शाळा, रात्रशाळा शिक्षक, प्रशिक्षण शाळा सत्यशोधक शाळा, सामवैदिक शाळा, अरबी शिक्षण शाळा, आणि पाटील शिक्षण शाळा, आणि अस्पृश्यांकरिता विशेष शाळा, छ. शाहू यांनी स्थापन केल्या.

सक्तीच्या आणि मोफत शिक्षणाची ओळख झाल्यामुळे १९१७ ते १९१८ मध्ये विध्यार्थीसंख्या अचानक वाढली व ती १७३४९ साली १९१८ ते १९०० पर्यंत ही संख्या पुढे १९१८ ते १९०० पर्यंत २००९२, १९२१ आणि १९२२ पर्यंत अनुक्रमे २९९८८ पर्यंत वाढत राहिली म्हणजे शिक्षणाची आवड जनतेत निर्माण झाली. शिक्षणाचे महत्व त्यांना कळू लागले.

छ. शाहू यांच्या उच्च शिक्षणाविषयीच्या कल्पना मुलभूत स्वरूपाच्या व फारच महत्वपूर्ण होत्या. त्यांचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन केवळ डॉक्टर, वकील, इंजिनियर किंवा मुत्सद्दी बनविणे एवढेच नव्हते तर त्यापेक्षाही त्यांना शेती आणि व्यापार यांचे प्रशिक्षण देणे हे होते. छ. शाहू या मताचे होते की शेती, उद्योगधंदे, युद्ध इत्यादींच्या विकासासाठी शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. छ. शाहू श्रीमंत जयसिंगराव घाटगे (१८९७) यांनी स्थापन केलेल्या अभियांत्रिकी आणि औद्योगिक असे दर्जेदार शिक्षण देणारे आधुनिक उद्योगांच्या विकासासाठी एकमेव अद्वितीय अशी संस्था समजत असत. या संस्थेतील सर्व खर्च पूर्णपणे दरबार करीत असे. संस्थेमध्ये दरवर्षी सरासरी ४० ते ४५ विध्यार्थी पाचवी पास झालेले प्रवेश घेत असत आणि यांना १)सुतारकाम २)लोहारकाम ३)धातू जुलरी ४)पितळ झाळकाम ५)साधा इंजिन चालक ६)धंद्याविषयी सामान्य ज्ञान ७)मोटार यांत्रिक ८) विद्युत लेपन आणि ९)एकत्रित अभ्यासक्रम म्हणून 'विणकाम' हे शिकवले जात.

कृषी विज्ञानाचा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आणि हायस्कूल शेती परीक्षेसाठी पुण्याच्या शेतकी कॉलेजने घेतलेल्या परीक्षेस विध्यार्थी बसू लागले. १९०६ ते १९०७ मध्ये शेती प्रशिक्षण अभ्यासक्रम आणि आदर्श शेती फॉर्मस या शाळांना जोडण्यात आले. शारीरिक शिक्षण आणि क्रीडा यांनासुद्धा अधिकारी मंडळींकडून विशेष स्थान देण्यात आले. उच्चशिक्षणाच्या प्रोत्साहनाकरिता मागास आणि अस्पृश्य विद्यार्थ्यांना नादारी, शिष्यवृत्ती इत्यादी विविध सुविधा पुरविण्यात आल्या विध्यार्थ्याला कोणत्याच शिक्षण शुल्काचे बंधन नव्हते आणि यशस्वी विद्यार्थिनिंना सर्वच वर्गातील विशेष पारितोषिक देण्यात येत असत.

छ. शाहू यांनी निरनिराळ्या कारणासाठी शाळा स्वायत्त केल्या उदाहरणार्थ १)पाटील शाळा २)पुरोहित शाळा ३)युवराज शाळा ४)उद्योगशाळा ५)संस्कृत शाळा ६)सत्यशोधक शाळा ७)सैनिक शाळा

त्यांनी संगीत शाळा, नृत्यशास्त्र, नारकशास्त्र, मत्सविद्या, क्रीडा आणि इतर अनेक क्षेत्रांना प्रोत्साहन दिले. शिक्षणाच्या प्रसारासाठी छ. शाहुनी शिक्षण कर पण सुरु केला. ग्रंथालयाकरिता पुरेसे निधी उपलब्ध केले. कारण ग्रंथालयाच्या द्वारे ग्रामीण शिक्षणाचा प्रसार व्हावा हे त्यांचे उद्दिष्ट होते. कोल्हापुरातील वसतिगृह चळवळीचा सुद्धा आढावा घेतल्याखेरीज शिक्षणावरील चर्चा पूर्ण होऊ शकणार नाही.

**व्यापार आणि व्यवसाय/औद्योगिक विकास:-**

छ. शाहू यांनी शेती आणि औद्योगिक विकास यांच्यापासून व्यापाराला वेगळे तोडले नाही. ते या विचाराचे होते की हे सर्व परस्पर अवलंबित आहेत या एका क्षेत्रातील विकास दुसऱ्या क्षेत्रातील विकासावर परिणाम करतो. छ. शाहुनी व्यापार आणि व्यवसायाच्या विकासासाठी कोल्हापूरच्या शाहुपुरीची स्थापना केली.

**औद्योगिक विकास:-**

राज्याची संपन्नता आणि प्रगती औद्योगिक विचारावरच अवलंबून होती असे ते मानत होते. छ. शाहुनी राष्ट्रीय उत्पादन संपत्तीचा साधने आणि व्यापार यांची वृद्धी औद्योगिक विकासामधून येते हे माहित होते. नागरी आणि ग्रामीण भागांमधील भेदभाव कमी करता यावा आणि कामासाठी यांना ग्रामीण भागातील उद्योगांच्या विकासावर जोर दिला. थोडक्यात असे म्हणता येईल की केंद्रीकरणाएवजी मोठ्या शहरातील आरोग्य आणि स्वच्छता यांच्यासमस्या टाळण्यासाठी ते संपत्ती आणि उद्योगाच्या विकेंद्रीकरणाच्या बाजूचे होते. ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हेच त्यांच्या नियोजनाचे उद्दिष्ट्य होते.

**संदर्भ सूची :**

१. लड्ठे आबा, "श्री. शाहू छत्रपती यांचे चरित्र", टाईम्स ऑफ इंडिया प्रेस, मुंबई

२. डॉ. भोसले एस.एस., "राजषी शाहू: काळ, विचार आणि कार्य.", कोल्हापूर जिल्हा परिषद, १९७५,

३. डॉ. खरात संभाजी , "राजर्षी शाहूंचे शेक्षणिक धोरण", दै. एकमत, दिनांक २६-०७-२००२.

४. प्रा. आढाव विलास,"माणसातील राजा, राजामधील माणूस", दै. सामना दिनांक २७-०६-२००२.

५. प्रा. कडवे रघुनाथ, "लोकांचा राजा छत्रपती शाहू महाराज", शशी प्रकाशन, गणेशनगर, बोरगाव मेघे, ता.जि. वर्धा, द्वितीय आवृत्ती.